वाणिज्य शाखेमध्ये रोजगाराच्या संधी- श्री. चेतन गोडबोले

"वाणिज्य क्षेत्रातील अभ्यासक्रमासोबतच इतर आधुनिक कौशल्ये जर विद्यार्थांनी आत्मसात केले, तर वाणिज्य क्षेत्रांमध्ये भरपूर रोजगाराच्या संधी उपलब्ध असुन चांगल्या करिअरसाठी 'वाणिज्य हे एक उत्तम असे क्षेत्र आहे'" असे प्रतिपादन निलया फाउंडेशन, पुणे येथील श्री. चेतन गोडबोले यांनी केले. ते श्री व्यंकटेश महाविद्यालय येथे कॉमर्स असोसिएशन मार्फत घेण्यात आलेल्या वाणिज्य - संधींचा मोठा महासागर " या विषयावरील आयोजित कार्यक्रमामध्ये बोलत होते. त्यांनी वाणिज्य क्षेत्रातील विविध प्रकारच्या संधी उपलब्ध असुन त्यासाठी आवश्यक कौशल्य विद्यार्थ्यांनी आत्मसात करून अचुकरीत्या ओळखून त्यामध्ये करिअर केले पाहिजे असे सांगितले. तसेच गेम्सच्या माध्यमातून या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधत सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने उपस्थित होते. आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये त्यांनी वाणिज्य क्षेत्राचे महत्त्व व विद्यार्थ्यांनी योग्य दिशेने प्रयत्न केल्यास त्यांचे भविष्य उज्वल असणार आहे यात शंका नाही, त्यामुळे अभ्यासाचे योग्य नियोजन करून करिअर घडवावे असे मार्गदर्शन केले. तर कार्यक्रमाच्या सुरुवातीस वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. बी. एन. कांबळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले व प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मोहिनी अंचलिया व कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. टी. एच. नायकवडी यांनी केले.  कार्यक्रमास शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

